16 OCT 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## डॉ. जयसिंगराव पवार : विद्यापीठात 'शिवजागर' विशेष परिसंवाद

# शिवरायांनी प्रत्येक हृदयात स्वराज्य निर्मिले

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १५ : 'छत्रपती शिवाजी महाराजांनी केवळ भूमीवर नव्हे, तर प्रत्येक मराठ्याच्या हृदयात स्वराज्य निर्माण केले', असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागाचे छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्र, कृष्णा पब्लिकेशन्स आणि सह्याद्री प्रतिष्ठान मुळशी यांच्यातर्फे शिवराज्याभिषेक दिनाच्या ३५० व्या वर्षानिमित्त आयोजित 'शिवजागर' या विशेष परिसंवादामध्ये



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील 'शिवजागर' परिसंवादात ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी विचार मांडले. यावेळी डावीकडून डॉ. अशोक चौसाळकर, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, डॉ. सदानंद मोरे, गणेश राऊत, अनिल पवार उपस्थित होते.**

ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यक्र मा अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.

डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, 'शिवराज्याभिषेकाचे हिंदुस्थानच्या इतिहासात अतिशय मोलाचे स्थान होते. राज्याभिषेकाची संकल्पना शिवाजी महाराज आणि त्यांच्या मातोश्री जिजाऊसाहेब यांना सुचणे हीच मुळी क्रांतिकारक बाब होती. स्वतंत्र राज्य निर्मितीबरोबरच त्यामध्ये सार्वभौमत्वाच्या संकल्पनेला मोठे स्थान महाराजांनी त्यात दिले होते.'

डॉ. सदानंद मोरे म्हणाले, 'शिवराज्याभिषेक ही इतिहासाचा प्रवाह बदलणारी घटना होती आणि छत्रपती शिवाजी महाराज हे त्याचे इतिहास नायक होते. त्यांच्या नायकत्वावर शिक्कामोर्तब करणारा हा दिवस आहे.'

प्रा. डॉ. अशोक चौसाळकर म्हणाले, 'राज्याभिषेकाच्या निर्णयामुळेच पुढे भारताचा राजकीय नकाशा बदलला.' कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'शिवजागर' या उपक्रमाच्या माध्यमातून शिवाजी महाराज आणि त्यांचा इतिहास सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचविण्यात निश्चितपणे यश येईल.' इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनिश पाटील यांनी प्रास्ताविक केले.

**मोठी खंत वाटते...**

डॉ. पवार म्हणाले, 'शिवाजी महाराजांच्या मनात स्वातंत्र्य व सार्वभौमत्वाच्या बरोबरीनेच दिल्ली काबीज करण्याची महत्त्वाकांक्षा होती, याचे पुरावे आहेत. त्यांच्या माघारी स्वराज्याची व्यापक संकल्पना त्यांच्या वंशजांना पेलली नाही, किंबहुना समजलीच नाही, याची मोठी खंत वाटते.'

डॉ. जयसिंगराव पवार : शिवाजी विद्यापीठात 'शिवजागर' परिसंवाद

# शिवाजी महाराजांनी मराठ्यांच्या हृदयात स्वराज्य निर्माण केले

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : छत्रपती शिवाजी महाराजांनी केवळ भूमीवर नव्हे, तर प्रत्येक मराठ्याच्या हृदयात स्वराज्य निर्माण केले, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी शनिवारी केले. शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागाचे छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्र, कृष्णा पब्लिकेशन्स आणि सह्याद्री प्रतिष्ठानतर्फे शिवराज्याभिषेक दिनाच्या ३५० व्या वर्षानिमित्त आयोजित 'शिवजागर' परिसंवादामध्ये प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते.



शिवाजी विद्यापीठात शनिवारी 'शिवजागर' परिसंवादात ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. अशोक चौसाळकर, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. सदानंद मोरे, डॉ. गणेश राऊत, उपस्थित होते.

इतिहासाचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. सदानंद मोरे म्हणाले, शिवराज्याभिषेक ही इतिहासाचा प्रवाह बदलणारी घटना होती. मराठ्यांमुळेच पुढे दिल्ली वाचली, हे मराठ्यांचे उपकार आहेत. अन्यथा, या भारतावर अफगाणांचे वर्चस्व प्रस्थापित झाले असते.

ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर म्हणाले, महाराजांच्या राजसत्तेला अधिमान्यता मिळवून देणे, हा शिवराज्याभिषेकामागील प्रमुख हेतू होता. या राज्याभिषेकामुळेच पुढे भारताचा राजकीय नकाशा बदलला.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'शिवजागर' उपक्रमाच्या माध्यमातून शिवाजी महाराज आणि त्यांचा इतिहास सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचविण्यात निश्चितपणे यश येईल. इतिहास अधिविभागप्रमुख अवनीश पाटील यांनी स्वागत केले. अनिल पवार यांनी 'भूमिका विषद केली. चेतन कोळी यांनी सूत्रसंचालन केले.

## राज्यकर्त्यांना खरे 'शिवाजी' समजलेच नाहीत

डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, शिवाजी महाराजांच्या मनात स्वातंत्र्य बरोबरीनेच दिल्ली काबीज करण्याची महत्त्वाकांक्षा होती.पण, अकाली निधनामुळे ते शक्य झाले नाही. त्यांच्या माघारी स्वराज्याची व्यापक संकल्पना त्यांच्या वंशजांना पेलली नाही, राज्यकर्त्यांना खरे 'शिवाजी' आणि त्यांचे तत्त्वज्ञान समजलेच नाही.

तरूण भारत

# वाचन संस्कृती जपण्याची गरज

## डॉ. व्ही. एन. शिंदे : शिवाजी विद्यापीठात भारतीय भाषा उत्सव

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यार्थ्यांनी वाचा, वेचा, साठवा, आणि उपयोगात आणा या चतु:सूत्रीतुन वाचन संस्कृती जपली पाहिजे असल्याचे मत विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागाच्यावतीने आयोजित भारतीय भाषा उत्सव अंतर्गत पोस्टर प्रदर्शन कार्यक्रमात ते बोलत होते. इंग्रजी विभागाचे प्राध्यापक डॉ. प्रभंजन माने यांची प्रमुख उपस्थिती होती.

भारतीय जीवन बीमा निगमचे मुख्य प्रबंधक राजेंद्र पाटेकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यू. जी. सी. दिल्लीने दिलेल्या निर्देशाप्रमाणे या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. हिंदी, संस्कृत, मराठी, बुंदेलखडी, अवधी, मैथिली, मारवाडी, उर्दू, आदी भाषांचा परिचय देणारे पोस्टर प्रदर्शन विद्यार्थ्यांनी भरवले होते. डॉ. चंदा सोनकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. विजय सदामते यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. अमृता कांबळे यांनी सूत्रसंचालन केले.

लोकमत

# डॉ. हिर्डेकर यांचे आज व्याख्यान

कोल्हापूर : 'वाचन प्रेरणा' दिनाचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्र आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र अधिविभागाच्या संयुक्त विद्यमाने आज, सोमवार, दि. १६ ऑक्टोबर सकाळी ११ वाजता ग्रंथालयाच्या नवीन विस्तारित इमारतीतील व्हर्च्युअल क्लासरूममध्ये का वाचावे आणि काय वाचावे? या विषयावर माजी परीक्षा नियंत्रक डॉ.बी.एम. हिर्डेकर यांचे व्याख्यान होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के असून, प्रकुलगुरू डॉ.पी.एस. पाटील आणि कुलसचिव डॉ.व्ही.एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती आहे.